| MHAH080015062014 | <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ११३/२००० मधील</u><br><u>नि. २२० वरील आदेश</u><br>*(आण्णा पंढरीनाथ लेंडे व इतर*<br>*विरुद्ध*<br>*गणपत बाबुराव लेंडे व इतर)* |
|---|---|

वादीने सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ०६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीचे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नाते दाव्यामध्ये पती पत्नी असे नमुद असुन दावा अंतिम युक्तीवादावर असतांना प्रतिवादी क्र. १ व त्यांची पत्नी प्रतिवादी क्र. २ यांच्या वयातील तफावत जास्त दिसुन आल्याने वादीचे वकिलांनी त्याबाबत वादी यांना विचारणा केली असता त्यांनी प्रथमच अशी माहिती दिली की, प्रतिवादी क्र. २ ही प्रतिवादी क्र. १ ची दुसरी पत्नी आहे. प्रतिवादी क्र. १ यांच्या पहिल्या पत्नीचे नाव सिताबाई होते. त्यामुळे दुसऱ्या पत्नीचे नाव देखील सिताबाई ठेवलेले होते. प्रतिवादी क्र. १ यांची दुसरी पत्नी म्हणजे प्रतिवादी क्र. २ यांना कोणतेही अपत्य नाही. याउलट, प्रतिवादी क्र. ३ व ६ ते ८ ही सर्व अपत्य प्रतिवादी क्र. १ यांच्या पहिल्या पत्नीपासुन झालेली अपत्य आहेत. त्यामुळे, वंशावळीमध्ये प्रतिवादी क्र. २ यांच्या नावापुढे दुसरी पत्नी असा उल्लेख करुन वंशावळीच्या सुरवातीला सिताबाई यांच्या नावापुढे पहिली मयत पत्नी असा उल्लेख करुन प्रतिवादी क्र. ३ व ६ ते ८ यांच्या नावापुढे प्रतिवादी क्र. १ यांच्या पहिल्या पत्नीपासुन झालेले अपत्य असा उल्लेख करुन तशी दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीने विनाकारण विलंब करुन दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतुने मोघम कथनाच्या आधारे कुठल्याही संयुक्तिक कारणांशिवाय सदरचा अर्ज दाखल केला आहे असे कथन करुन वादी यांचा अर्ज गुणदोषावर निश्चित करतांना जास्तीत जास्त खर्चाचा आदेश करावा अशी विनंती केली आहे.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी यांनी मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्या नातेसंबंधाबाबत असुन सदर बाब

दावा दाखल करतांना काळजीपुर्वक अभ्यासुन नमुद करणे आवश्यक होते. वादी यांनी सदर अर्जामध्ये वादीच्या वकिलांना वादी यांनी त्यांच्या निरक्षरपणामुळे योग्य वेळी माहिती दिली नाही, त्यामुळे सदर नातेसंबंधाबाबत वाद कथनांमध्ये स्पष्टता नमुद करण्यात आली नाही, असे कारण सांगितले. प्रस्तावित दुरुस्ती पाहता वादी व प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंधामध्ये होणारा बदल दाव्यातील अंतिम मागणीवर निर्णायकपणे बदल करणारा ठरु शकतो. सदर दुरुस्ती दाव्यातील खरा वादाचा प्रश्न पुर्णपणे निश्चित करण्यासाठी आवश्यक दिसुन येते. परंतु, सदर दुरुस्ती करण्यासाठी वादीने अवाजवी विलंब केलेला असुन फक्त निरक्षरपणामुळे सदर बाब दुर्लक्षित केल्याचे नमुद केले आहे. प्रस्तावित दुरुस्तीची आवश्यकता पाहता सदर अर्ज वादी यांचेवर दिवाणी प्रक्रिया संहिता ३५(ब) प्रमाणे विलंब केल्याबाबत खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज (नि.२२०) खर्चासह मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना रक्कम रु. ५,०००/– (रक्कम रु. पाच हजार मात्र) खर्च देऊन दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत तात्काळ दाखल करावी. |
| ३. | वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी. |

SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE

Digitally signed by SHUBHANGEE BALASAHEB DHAWALE
Date: 2026.02.25 10:33:17 +0530

संगमनेर

दि. २३/०२/२०२६.

**(श्रीमती. एस.बी.ढवळे.)**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.